Office of the Collector HINGOLI

# जिल्हा निवड समिती हिंगोली
# कंत्राटी विधी अधिकारी पदभरती 2011

## जाहिरात क्रमांक. 2011/अ-2/आस्था-1/कावी-1537 दिनांक 20/09/2011)

**अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक : 05/10/2011**

1) महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमां. ईएसटी- 2010/प्र.क्र.42/ई- 8 दिनांक 06/04/2011 व 30/07/2011 अन्वये महसुल प्रशासनातील क्षेत्रिय स्तरावरील व जिल्हाधिकारी कार्यालयातील न्यायालयीन कामकाज पार पाडण्यासाठी जसे जिल्हा स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणात परिच्छेद निहाय अहवाल तयार करणे, न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणाचा तातडीने निपटारा होण्यास मदत व्हावी या दृष्टीकोनातुन विधी अधिकारी पद तात्पुरत्या स्वरुपात निर्माण केले आहे. सदर पदास दरमहा (रु. 20,000/- ) वीस हजार केवळ मानधन अधिक दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी दरमहा 5,000 रु. इतकी ठोक रक्कम देण्यात येईल. सदर पद हे जिल्हा निवड समितीच्या अखत्यारित राहील. तसेच संबंधित जिल्हाधिकारी हे नियुक्ती प्राधिकारी राहतील.

2) कंत्राटी पध्दतीने नेमणुक करावयाच्या विधी अधिकारी या पदासाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव कर्तव्य, व जबाबदा-या पुढील प्रमाणे आहेत.

### 1. शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदविधर असेल. तो सनद धारक असेल.
2. विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान (07)सात वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
3. उमेदवार महसुल विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.
4. उमेदवारास मराठी, हिंन्दी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.
5. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.

### 2. इतर अटी व शर्ती :-

1. सदर पदाची नेमणुक प्रथमतःही एकत्रित मानधनावर कंत्राटी करार पध्दतीने 11 महिन्याच्या मुद्दतीसाठी एका वेळी असेल. अशी मुद्दत वेळोवेळी वाढविता येईल. ही मुद्दत 11 महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त 03 वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास ते उमेदवारास पुनःश्च निवड प्रक्रीयेस समोर जावे लागेल.
2. सदर पदाची नेमणुक पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल हे विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाहीत.
3. कंत्राटी पध्दतीने निवड झालेल्या उमदेवारास विहीत प्रपत्रात करार पत्र करुन द्यावे लागेल.

## 3. विधी अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदा-या :-

1).कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

2. महसुल विषयक / परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे / सेवा विषयक / प्रशासकीय बाबी /विभागीय चौकशी इ. तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती या बाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

3) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

4) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे

5. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

6) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

7) विधी विषयक कामकाजात वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

## 4. अर्ज करण्यासाठीची माहीती :-

1) उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात 30से.मी. बाय 20 से.मी. आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला हस्तलिखित / टंकलिखीत वा चक्रमुद्रीत अर्ज करावा. उमेदवारांने अर्जातील माहिती /तपशील सुस्पष्टपणे नमुद करावा. अर्जासोबत स्वत:चे नांव व पत्ता नमुद केलेला 24 से.मी. 11से.मी. आकाराचा रु.5/- चे पोस्टाचे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

2) उमेदवाराने ओळखपत्रावरील छायाचित्राच्या आकाराचे त्याचे अलीकडचे काळातील छायाचित्र आवेदन पत्रावर विहीत जागी स्वसाक्षांकित करुन घट् चिकटवावे.

3) उमेदवाराने संपुर्ण भरलेला आपला अर्ज , शैक्षणिक अर्हता, अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादीच्या साक्षांकित प्रतीसह विहीत नमुन्यात भरुन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली या पत्त्यावर दिनांक 05/10/2011 पर्यंत कार्यालयीन वेळेत (सायंकाळी 05.45 वाजेपर्यंत) पोहोचतील अशा बेताने समक्ष अथवा पोस्टाने पाठवावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. व यासाठी कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच या संबंधाने उमेदवारा समवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. टपालाने विलंबाने प्राप्त झालेले लिफाफे उघडण्यात येणार नाहीत. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

4) अर्जाच्या पाकीटावर कंत्राटी विधी अधिकारी या पदासाठी अर्ज असे स्पष्ट नमुद करावे.

5) या जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

Office of the Collector HINGOLI

6) छाननी अंती पात्र / अपात्र झालेल्या अर्जाच्या याद्या दिनांक:10/10/2011 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व या कार्यालयाच्या http://Hingoli.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

7) आवश्यकता असल्यास उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

8) काही प्रशासकीय अथवा तांत्रीक अडचण उद्भवल्यास निवड स्थगीत किंवा रद्द करण्याचे व नव्याने जाहिरात देण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.

9) उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

10) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

11) सदरची नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही.

12). उमेदवाराची निवड कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याने एकत्रित मानधन + दुरध्वनी व प्रवास खर्चाशिवाय अन्य कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

13). विहीत नमुन्यात नसलेले अर्ज, अर्जावर स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवाराचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज फोटो नसलेला व फोटो स्वसाक्षांकित न केलेला अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, इ. बाबत साक्षांकित प्रत न जोडलेले अर्ज, विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज तसेच अर्जामध्ये दर्शविण्यात आलेली पात्रता तसेच वकीली व्यवसाय अनुभव दर्शविण्यासाठी उमेदवाराने न्यायालयात विविध प्रकारच्या प्रकरणात विधिज्ञ म्हणुन काम पाहिले आहे त्या विविध प्रकरणांच्या मा. न्यायालयाच्या आदेशाच्या साक्षांकित प्रती न जोडलेला अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

14). सदर जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हयाच्या संकेतस्थळावर (Website) वर व आस्थापना विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे उपलब्ध आहे. संकेत स्थळाचा पत्ता http://Hingoli.nic.in असा आहे.

**दिनांक :- 20/09/2011**
**ठिकाण :- हिंगोली**

**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी हिंगोली**
करिता

# अर्जाचा नमुना
# (कंत्राटी विधी अधिकारी या पदासाठी)

**अर्जाचा आवक क्रमांक (                    )**                    **दिनांक :    /09/2011**

| उमेदवाराचा अलीकडच्या काळातील काढलेला व स्वसाक्षांकित केलेला पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

**प्रति,**

**मा. निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**सदस्य सचिव निवड समिती,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.**

**विषय :- कंत्राटी विधी अधिकारी या पदाकरीता अर्ज.**

मी आपल्या कार्यालयाची जाहिरात दिनांक :   /09/2011 ला अनुसरुन कंत्राटी विधी अधिकारी या पदासाठी अर्ज करीत असुन माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे आहे.

1. उमेदवाराचे संपुर्ण नांव (मराठीमध्ये) :-   आडनांव :--------------------------------------------------
स्वतःचे नांवः--------------------------------------------------
वडीलाचे /पतीचे नांव :--------------------------------------------------

2.पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :- --------------------------------------------------
घर क्रमांक----------------गाव /शहर------------------पोस्ट--------------------
तालुका------------------जिल्हा--------------------पिन कोड--------------------
दुरध्वनी क्र.-----------------------भ्रमणध्वनी क्र.------------------------------

3. उमेदवाराचा जन्म दिनांक (अंकात) :-   दिनांक [   ]   महिना [   ]   वर्षे [   ]

अक्षरी :--------------------------------------------------------------

4.अर्ज सादर करण्याचे शेवटच्या दिवशीचे वय 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.  दिनांकः   /09/2011 रोजीचे वय

5. राष्टीयत्त्व :------------------------------------

6. उमेदवार पुरुष / स्त्री :-   स्त्री [   ]   पुरुष [   ]

7. उमेदवार विवाहीत आहे की अविवाहीत :- विवाहीत [ ] अविवाहीत [ ]

8. उमेदवाराची शैक्षणिक पात्रता :-

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | संस्थचे / बोर्डाचे /विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्षे | एकुण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |
| 5 | | | | | | |

9. वकिली व्यवसायाचा किती वर्षाचा अनुभव आहे :------------------------------------------------------------
10. उमेदवार महाराष्ट्राचा मुळ रहिवाशी आहे काय ? :- होय / नाही

मी याव्दारे असे प्रमाणित करतो /करते की, माझ्या माहिती नुसार वरीलप्रमाणे तपशील सत्य व अचुक आहे. या माहितीतील कोणताही तपशील चुकीचा / खोटा आढळुन आल्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल व माझेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

**दिनांक :-**
**ठिकाण :-**

**उमेदवारांची स्वाक्षरी व नांव**

## <u>लहान कुटंबाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी, श्री./श्रीमती/कुमारी: --------------------------------------------------------------------------
श्री.-------------------------------------------------यांचा / यांची मुलगा /मुलगी /पत्नी, वय वर्षे---------------
राहणार-------------------याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो /करते की,

1.मी----------------------------------------------------या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

2. आज रोजी मला -----------------संख्या इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक 28/ मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------आहे .

3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा आधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व जन्माला आलेल्या मुलांमुळे य पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

**दिनांक :**
**ठिकाण :**

**उमदेवारांची स्वाक्षरी व नांव**